# प्रभुतरुण

| वर्ष ५१ | अंक ०२ | मुंबई | ऑगस्ट, २०१७ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**

*संपादकीय*

## पुत्रशोक

—सुहासिनी कीर्तिकर

काही भलबुरे योग असतात. माझ्या आयुष्यात सुदैवाने भल्यातभले योगच जास्त आले. विशेषत: शिक्षणक्षेत्रात. विद्यार्थिनी असतानाही; नंतर प्राध्यापकी करतानाही. मी एलफिन्स्टन, इस्माईल युसूफ करत करत तीन वर्षांनी 'पार्ले टिळक'च्या मुलुंड कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून दाखल झाले; हा माझा भाग्ययोगच. नवीन कॉलेज, नवीन उमदे प्राचार्य, काही नवे करण्याची उमेद असलेले सहकारी... यामुळे बरेच चांगले पायंडे तेथे पाडता आले. उदा: - आठवड्यातल्या एका वारी आपल्या भाषेव्यतिरिक्त अन्य भारतीय भाषा शिकण्याचा उपक्रम. माझ्या सारखीला तमिळ शिकवायला चक्क आमची विद्यार्थिनी 'सीथा' होती. (हां! हां! तमिळ या शब्दाचा उच्चार नीट हं. 'मिळ' मधल्या 'इळ'चा उच्चार वेगळा आणि जीभ टाळ्याला मागे लावून करायचा बरं का.) मराठी वाङ्मय मंडळाचा खास 'पडसाद' हा षण्मासिक अंक प्रसिद्ध करणे किंवा महिन्यातल्या एका शनिवारी कॉलेज संपल्यावर कॉलेजच्या गच्चीत ज्यांना रस आहे अशा विद्यार्थी प्राध्यापकांनी एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करणे. वाङ्मयमंडळातर्फे महिन्यातली एक शनिवार संध्याकाळ 'आजकी शाम आपके नाम' म्हणत शास्त्रीय संगीताची मैफल भरवणे किंवा 'हरियाली'सारखे उपक्रम हाती घेऊन एखाद्या रविवारी मुलुंड टेकडीवर झाडे लावणे किंवा... किंवा.... किंवा...

याच 'किंवा'मध्ये एकदोन वर्षांनी आणखी एक भर पडली. वाङ्मयमंडळाचे स्वत:चे असे भित्तीपत्रक होते. प्राचार्य डॉ. भ. ग. बापट यांनी असं सुचविलं की जे विद्यार्थी शाळा संपवून कॉलेजमध्ये दाखल होतात त्यांच्यापैकी सर्वात जास्त गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची मुलाखतच घ्यायची अन् भित्तीपत्रकात ती प्रसिद्ध करायची. जेणेकरून इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल. त्याआधी पहिल्या वर्षीच्या विद्यार्थ्यांसमोर प्राचार्यांचे स्वागतपर भाषण आयोजित करताना अशा पहिल्या आलेल्या नवीन विद्यार्थ्याला गुलाबपुष्प देऊन सत्कार होतच असे. आता भित्तीपत्रकातही अशा विद्यार्थ्यांची मुलाखत. सुरुवात म्हणून ही मुलाखत मलाच घ्यायला सांगण्यात आलं. मीही मोठ्या उत्साहाने अन् नेटकेपणाने ही मुलाखत घेतली. विद्यार्थ्यांनाच काय; माझ्या सहप्राध्यापकांनाही ती फार फार आवडली. कुणाची होती ही मुलाखत?

दिलीप पेंडसे या विद्यार्थ्याची. (त्यावेळच्या माझ्या डायरीत ती अजून आहे मला वाकुल्या दाखवत.) अतिशय शांत स्वभावाचा, स्वच्छ उच्चार करणारा, विचारी, आत्मविश्वास असलेला हा मुलगा. गंमत अशी की दहावीच्या महत्त्वाच्या वर्षीदेखील त्याने त्याला मिळालेल्या गुणांच्या संख्येइतकेच भारंभार चित्रपट पाहिले होते. असं सहसा घडत नाही. (डॉ. गं. ना. जोगळेकरांचा अपवाद. एम्. ए. ला ते पुणे विद्यापीठातून मराठीत पहिले आले. पण परीक्षेच्या आदल्या दिवशीही चित्रपट बघून त्यांनी तणावाचे 'विरेचन' केले होते.) तर दिलीप असा अपवादात्मक मुलगा होता. कॉलेजच्या दुसऱ्या वर्षी विद्यापीठातर्फे परीक्षा. मराठीला त्याच वर्षी अभ्यासक्रमात बदल करून पाठ्यपुस्तकाबरोबरीने व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' लावली होती. म्हणजे शंभरातले वीस मार्क या कादंबरीवर आधारित प्रश्नांना होते. पण विद्यापीठाचा भोंगळ कारभार काय आजचाच आहे का? त्यावर्षी प्रश्नपत्रिकेत बनगरवाडीवर प्रश्नच नाहीत! इतर विद्यार्थी बापडे काय बोलणार, काय करणार? पण परीक्षेच्या हॉलमध्येच दिलीप उठला अन् म्हणाला, ''मी हा पेपर सोडवणार नाही. ८० गुणांचा पेपर सोडवून १०० गुणांची वाटणी करणार का? हा अन्याय आहे.'' मग पर्यवेक्षकांनी फोन करून चौकशी केली. प्रत्येक प्रश्नाचे गुण वाढवण्यात आले. दिलीपने अखेर पेपर दिला. मात्र परीक्षा झाल्यावर बापटसर, मी, दिलीपसारखे अनेक विद्यार्थी... अशा आम्ही विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे लेखी निषेध नोंदवला. (त्यातून गंमतीचेच सत्य बाहेर आले म्हणा! पेपर काढणाऱ्याला त्यावर्षी झालेला बदल म्हणे माहीतच नव्हता! आधीची प्रश्नपत्रिका समोर ठेवून काढला आपला पेपर! मग सारवासारव झाली.) असो. मला सांगायचे आहे ते अन्यायाविरूद्ध उभ्या ठाकणाऱ्या दिलीपबद्दलच. त्याचे वडील पुस्तकांचे फिरते विक्रेते होते. पुस्तकांची कापडी झोळी खांद्याला लावून ते अनेकदा आमच्या कॉलेजमध्ये यायचे. अशा मध्यमवर्गीय, सुसंस्कृत घरातून दिलीप आमच्याकडे आला होता. पण होता वेगळाच. असामान्य हुशार, कल्पक, शांतपणे पुढे-पुढे अन् पुढेच जाणारा. बी.कॉम. झाल्यावर त्याकाळी नव्यानेच सुरू झालेली 'सीएस्' परीक्षा त्याने दिली. ('कंपनी सेक्रेटरी'ची ही परीक्षा आता फारच बोकाळली आहे. पण तेव्हा तसे नव्हते.)

मग तो सहाजिकच 'टाटा' मध्ये लागला. आमच्या कॉलेजच्या वळणावरच तेव्हा 'शांतिसदन' नावाचा खरोखर शांत परिसर असलेला बंगला होता. तो पाडून तेथे इमारती आल्या. या एका इमारतीमधील ब्लॉक त्याला कंपनीतर्फे तेव्हा देण्यात आला. कॉलेजला जाता येता त्या वळणावर मग दिलीप अनेकदा निवांत भेटायचा. ''बाई, घरी येता? चला नं.'' म्हणायचा. त्याची बायकोही आमच्याच कॉलेजची सुंदर विद्यार्थिनी, लीना परांजपे नावाची. श्रीनिवास कुलकर्णींचा 'घंटीवाला' लेख अभ्यासक्रमात होता. त्यांचे 'डोह' हे पुस्तक तिने माझ्याकडे मागितले होते. मग मी तिला ते विकत घेऊन भेटच दिले होते. पुढे तिने दिलीप खूपच स्थावर झाल्यावर पार्ल्यात पार्लेश्वरसमोर हॉटेल काढले. त्या उद्घाटनालाही मी गेले होते. मी त्याच्या घरी मात्र कधी गेले नाही. म्हणायचे, ''अरे, येईन कधीतरी. तू सुखी आहेस ना? अशीच प्रगती करीत रहा. आनंद आहे मला त्यात.'' तेव्हा तो म्हणायचा, ''बाई, तुम्ही वेगळ्या आहात. इतर प्राध्यापक माझा पगार विचारतात. हेवाही करतात. पण तुम्ही माझं फक्त सुख मागता.'' पुढे तो त्याच कंपनीत वर वर चढला. दादरला रहायला गेला. मग कधीतरी कॉलेजच्या काही समारंभांना निमंत्रित म्हणून भेटायचा. ('हे' गेल्यावर मला भेटायला मात्र आठवणीने आला होता कॉलेजमध्ये) पण तशा भेटीगाठी विरळच झाल्या.

अन्.... अन् एक दिवस सर्वत्र ती वार्ता येऊन आदळली. त्याने कल्पकतेने अफरातफर केली. रतन टाटांचा विश्वासघात केला. त्याची नोकरी संपुष्टात आली... वगैरे वगैरे. त्यालाही चांगली चार पाच वर्षे झाली. लीना त्या धक्क्याने चार वर्षांपूर्वी गेली अन् अलीकडे काहीच्या काहीच बातमी तांडव करत वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानावर झळकली. दिलीपने आत्महत्या केली. दिलीपने? त्या शांत, विचारी मुलाने? `हे... हे... सगळं झालंच कसं? मी नेहमीच त्याचं सुख मागत असताना त्यानं आपल्या स्वत:च्या सुखाची व्याख्या इतकी कशी बदलली? न्यायासाठी दाद मागणारा हा विद्यार्थी यानं अन्यायाचा मार्ग अनुसरत चक्क 'हेराफेरी' करावी? असला कसला हा दैवाचा फेरा? आयुष्यात पहिल्यांदाच मी माझा विद्यार्थी घडविण्यात अपयशी ठरले; याची लाज लाज वाटली मला. काय काय वाटलं ते शब्दात नाही सांगता येणार मला. पण एवढं खरं की तेव्हाचा

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय
(पान १ कॉलम २ वरून)

दिलीप मनात परत परत उसळून वर यायला लागला. का? का? त्यानं असं का केलं?

या प्रश्नांना उत्तरं नाहीत. त्यावेळी भिक्तीपत्रकासाठी घेतलेल्या मुलाखतीचा शेवट मला आत्ता आठवतोय. वि.स.खांडेकर म्हणायचे की 'शिक्षक हे शिडी असतात. त्या शिडीवरून चढत चढत विद्यार्थी आपला विकास साधतात.' त्यांच्या या वाक्याचा आणि कल्पनेचा आधार घेऊन मी म्हटलं होतं की 'दिलीप, आमचा शिडीसारखा वापर करून तू कर्तृत्वाच्या आभाळात इतकी उंच झेप घे की आम्ही सारे माना उंचावून उंचावून तुझ्याकडे अभिमानाने पहात राहू.' आज? माना उंचावून त्याच्या कर्तृत्वाकडे पहाता पहाता आमची मान खाली झालीय.

मला कसलं दु:ख होतंय? त्याच्या अनपेक्षित शेवटाचं? की शिक्षक म्हणून माझ्या पदरी आलेल्या या धडा देणाऱ्या अनुभवाचं? एका परीनं हा शिक्षकाला झालेला पुत्रशोकच नाही का?

दिलीप गेल्याची बातमी वाचून माझ्या सहकारी मैत्रिणीला सहाजिकच माझी आठवण झाली. तिने मला फोन केला. बरंच सांत्वनपर बोलली. आमचे बापटसर अलीकडेच गेलेले. त्यांचा मेडिकलला असलेला तरणाताठा मुलगा फार पूर्वी गेला अन् त्यांनी हा परिसरच सोडून गोखले इन्स्टीट्यूटमध्ये पुण्याला अध्यापन स्वीकारले. त्यांनीही विद्यार्थीबंध असाच बांधलेला. ही माझी मैत्रीण बोलता बोलता म्हणाली, ''बरं झालं बापटसर आधीच गेले ते. नाहीतर त्यांना दुसऱ्यांदा पुत्रशोक झाला असता. '' खरंय. अस्सल शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांमध्ये स्वत:चे कलम करून जगत, वाढत असतो ना!

पण शोक झाला तरी सांगणार कुणाला? हे 'अस्वस्थ मनाचं वर्तमान' आहे. स्वीकारायलाच हवं! वाचकहो, फक्त तुमच्यासमोर मन मोकळं केलं एवढंच.

*

## पाठारे प्रभु सोशल समाज

शनिवार दि. ८ जुलै २०१७ रोजी पाठारे प्रभु चॅरिटीजच्या व्यंकटेश मंदिरात दरवर्षीप्रमाणे 'अभंगयात्रा' झाली. अखंडपणे चालत असलेल्या अभंगयात्रेचे यंदाचे ३५ वे वर्ष होते. म्हणजे जवळजवळ तीन तपे ही अभंगयात्रा वाट चालतेय! समाजाच्या सं. चिटणीस सौ. नीता सेंजित यांनी सर्वांचे स्वागत केल्यावर 'यात्रा' चालू झाली. विश्वस्त श्रीम. वंदना नवलकरांनी आपले मनोगत व्यक्त केले; तर प्रास्ताविक केले समाजाध्यक्षा श्रीम. स्वाती राणे यांनी. स्वाती राणे या गेली वीस वर्षे या 'यात्रे'चे निवेदन करीत होत्या. पण यंदापासून खांदेपालट झाला आणि निवेदनाची धुरा सौ. नीता सेंजित यांनी वाहिली. या बदलाची स्वाती राणे यांनी आपल्या भाषणात आवर्जून दखल घेतली.

अभंग यात्रेची सुरुवात व्यंकटेशाला आवाहन करून झाली. श्री. अभिजीत विजयकरांतर्फे हार श्रीफळ अर्पण करण्यात आले; पेढ्यांचा प्रसाद समाजाध्यक्षा स्वाती राणेंतर्फे होता. समाजाचे विश्वस्त श्री. अजित तळपदे यांच्यातर्फे सर्वांना कॉफीचा लाभ झाला. मग झाली यात्रेला खऱ्या अर्थाने सुरुवात. वरुण राणे याच्या गणेशस्तवनाने यात्रेकरूंना आनंद दिला. सर्वात छोटा गायक विवान श्रीपाद आगासकर याने मीराबाईंच्या भजनाने तो द्विगुणीत केला. वरुण, विवान यांच्या बाल आणि मधुर स्वरांनी वातावरण निर्मिती झाली. त्यानंतर सौ. रॉनिका विजयकरांनी गणपतीचेच ओवाळणी गीत

(पान ५ कॉलम ४ वर)

*(गेल्या अंकात विनायक जोशींनी जागवलेल्या मोहनतारांच्या आठवणीबद्दल लिहिले होते. तत्कालीन संपादक श्री. विहंग नायक यांनी लिहिलेले संपादकीय (मृत्यूलेख) पुन्हा छापून मोहनतारांच्या स्मृतिला उजाळा देत आहोत - संपादक)*

# खुदकन गाली हसले मी जाणून बुजून फसले

**-विहंग नायक**

शीर्षकातील शब्दांच्या गोड बोलांना आपल्या गोड आवाजात गाऊन अख्ख्या महाराष्ट्रात आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवणाऱ्या श्रीमती मोहनतारा शशीनाथ अजिंक्य ह्यांना गेल्या ३० जानेवारी रोजी देवाज्ञा झाली. मंगेशकरयुग उदयाला यायच्या खूप अगोदर श्रीमती मोहनतारा ह्या पार्श्वगायिका म्हणून मान्यता पावलेल्या होत्या. नुसत्या महाराष्ट्रात नव्हे तर मध्यप्रदेश, उत्तर प्रदेशातसुद्धा तिथल्या संगीत उत्सवाच्या कर्मभूमीत मोहनतारांनी आपल्या मैफिली रंगवून आपलं असं स्वत:चं स्थान अनेक संगीतप्रेमींच्या मनात ठसवलं होतं. शास्त्रोक्त गायकीबरोबर भावगीत गाण्यातही त्यांचा हातखंडा होता. गोड गळा, स्पष्ट शब्दोच्चार, शास्त्रीय संगीताचा रियाज ह्यांच्या जोडीने त्यांचे गाणे नुसतं मेंदूतून उतरून ओठावर यायचं नाही तर; ओठावर येण्यापूर्वी ते त्यांच्या हृदयाला भेट देऊन यायचं आणि म्हणूनच श्रोत्यांच्या मनाचा ठाव घ्यायचं.

दुर्दैवानं आमच्या पिढीला मोहनतारांच्या मैफिली ऐकण्याचं भाग्य लाभलं नाही. आमच्या मनाची जडण घडण होत होती तेव्हा मंगेशकरयुगाने अख्ख्या चित्रपट-सृष्टीचा ताबा घेतला होता. हे जरी खरं असलं तरी अशी अनेक वडीलधारी मंडळी आम्हाला ठाऊक आहेत की जी अजूनही मोहनतारांच्या गाण्याविषयी आणि आवाजाबद्दल भारावून बोलतात. सुहास कोठारेंच्या तोंडून तर मोहनतारांच्या गाण्याबद्दल अनेक प्रशंसोद्गार आम्ही ऐकले आहेत. मोहनतारा बैठकीत गायच्या त्या खास परभी शालू नेसून आणि दागदागिने घालून. शालीनतेचं आणि सुसंस्कृतपणाचं एक तेजोवलय त्यांच्याभोवती सतत असायचं आणि त्यामुळेच अनेक रसिकांच्या त्या श्रद्धास्थान होत्या.

तळपदे कुटुंबातील मोहनतारा ह्या सर्वात ज्येष्ठ भगिनी. तळपदे कुटुंब गिरगावात राहत होतं त्यावेळेस आमचं जाणं येणं त्यांच्या घरी असायचं. मोहनतारा तळपदे ह्या त्यावेळेस श्रीमती मोहनतारा अजिंक्य झाल्याने काँग्रेसहाऊस आणि नंतर दादर येथे वास्तव्याला होत्या. त्यामुळे त्यांची प्रत्यक्ष भेट तशी अभावानेच झाली.

तळपदे कुटुंब एक दिलखुलास कुटुंब. बिपीन तळपदे तर नाट्य क्षेत्रातले म्हणून जास्त परिचयाचे. पण सर्व बंधू मोहनतारांचा विषय निघाला की भरभरून बोलायचे. त्याचं मुख्य कारण म्हणजे महाराष्ट्राला आपल्या गोड आवाजानं मोहवून टाकणारी त्यांची जेष्ठ भगिनी मोहनतारा गोड गळ्याची तर होतीच पण त्याहूनही जास्त गोड स्वभावाची होती.

मोहनतारांची धाकटी बहीण रोशनतारा त्याही गायच्या. त्यांनी सांगितलेल्या काही आठवणी इथे सांगण्याचा मोह आम्हाला आवरत नाही.

दुपारची वेळ होती. मोहनतारा आणि रोशनतारा दोघी बहिणी बेसन लाडू करत घरात बसल्या होत्या. तेवढ्यात नभोवाणीवरून एक गृहस्थ आले आणि त्यांनी मोहनतारांना ताबडतोब रेडिओ स्टेशनवर पाचारण केले. एका गीताचं रेकॉर्डिंग करायचे होतं आणि दुसऱ्याच दिवशी रेडिओवर ते ऐकवायचं होतं. बेसन लाडू अर्ध्यावर सोडून मोहनतारा रेडिओ स्टेशनला गेल्या आणि श्री. वाटवेनी लावलेल्या चालीवर त्यांनी दोन तासात खालील गाणं रेकॉर्ड केलं.

झाली सकाळ
विरे अंधार
कपिले तुझी काढते धार

बेसन लाडूवरून रोशनतारांनी आपल्या बहिणीची आणखीन एक आठवण सांगितली. मोहनतारा एक सुग्रण गृहिणीही होत्या. घरी आलेल्या पाहुण्याला वेगवेगळे पदार्थ खायला घालण्याची त्यांना हौसच होती. त्यांचं मुख्य कारण म्हणजे मोहनतारा माणूसवेड्या होत्या. माणसं जोडायची आवड तंबोऱ्याच्या तारा जोडण्याच्या आवडीसारखी जबरदस्त. हात अत्यंत उदार. त्या श्यामला माजगांवकरांच्या संगीत क्लासमध्ये शिकल्या पण पुढे पार्श्वगायिका म्हणून प्रसिद्ध पावल्यानंतर त्यांनी स्वत:चे संगीत वर्ग चालू केले. विद्यार्थिनीसाठी क्लासची फी फक्त महिना पाच रुपये असायची. पण ज्या विद्यर्थिनींना तेव्हढी फी देणंही जमत नसे त्यांना मोहनतारा मोफत शिक्षण द्यायच्या. पाठारेप्रभु महिला समाजाची एकदा सहल जाणार होती. मोहनतारांनी घरी बेसन लाडू बनवले आणि बसमध्ये सर्व महिलांना खायला घातले. त्या बेसन लाडवांची चव अजूनही जीभेवर असल्याचं सांगणाऱ्या अनेक भगिनी आजही हयात आहेत.

डॉ. विनोद धुरंधरांच्या पत्नी सौ. अनुराधा ह्यांची मोहनतारा ह्या मामी. त्यांनी सांगितलेली आठवणही हृदयस्पर्शी आहे. १९५३ साली सौ. अनुराधा मॅट्रिकची परीक्षा पास झाल्या. त्या प्रीत्यर्थ मामींनी म्हणजे मोहनतारांनी मैसूर जॉर्जेटची साडी त्यांना भेट म्हणून दिली. मॅट्रिकच्या यशापेक्षा मामीची ही प्रेमळ भेट अनुराधाकाकींना आजही अप्रूप वाटते.

सौ. केतकी राजन जयकर ह्यातर मामींबद्दल भरभरून बोलल्या. सौ. केतकी, मामींच्या म्हणजे मोहनतारांच्या घरी दोन वर्ष वास्तव्य करून होत्या. तेथे असतानाच त्यांनी कायद्याचा अभ्यास पूर्ण केला. कायदेपंडीत श्री. राजन जयकर आणि केतकी ह्यांचं लग्नही मोहनतारांनीच जुळवलं. तशी अनेकांची लग्नं मोहनतारांच्या शिफारशीने जुळली. संगीताचे सूर जुळवण्याची हुकमत असलेल्या मोहनतारा माणसा माणसातले सूरही जुळवण्यात तरबेज असलेल्या एक महान कलाकार तर होत्याच पण त्याहूनही जास्त माणुसकीचं दर्शन घडवणाऱ्या साक्षात्कारी होत्या.

श्री. माधव प्रभाकरांच्या पत्नी ज्यांना अनेकजण प्रेमानं किकीबाय म्हणून ओळखतात; त्या म्हणाल्या, की मोहनतारांचा जन्म धनत्रयोदशीला झाला म्हणून मामांकडं त्याचं नाव धनश्री होतं. आपल्या संगीताच्या धनाची त्यांनी पाठारेप्रभू ज्ञातीवर उधळण केलीच; पण महाराष्ट्रातील अनेक रसिकांना अभिजात संगीताच्या अविष्काराने श्रीमंत केलं. मुंबई महाराष्ट्राच्या कलाजीवनात आपला असा ठसा उमटवणारे पाठारे प्रभु कलावंत हातांच्या बोटांवर मोजता येतील एव्हढेच. मोहनतारांच्या निर्वाणाने त्यात आता आणखी एकाची उणीव झाली हे सत्य मान्य करावचं लागेल. ईश्वरेच्छा बलीयसी.

*

**कथाकली**

# चॅटरूम

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

चैतन्य खरेनं हातातले कागद एकत्र केले. त्या कागदावर पुन्हा एकदा नजर फिरवली. नंतर त्यानं ते कागद हवे होते तसे क्रमवार लावले. इतक्यात रचना त्याच्या खोलीत आली. हातातलं बाड त्याच्या टेबलावर ठेवत तिनं विचारलं - ''चैतन्य, काय करताय?''

''रचना, मी तुला बोलावणारच होतो. पण माझं थोडंसं काम राहिलं होतं म्हणून मघाशी हाक मारली नाही तुला.''

''चैतन्य, मी तुम्हाला सांगितलेल्या कामाचं काय झालं?''

''त्याचीच तर ही तयारी आहे'' - हातातले कागद एकत्र उंचावून दाखवीत चैतन्य म्हणाला.

''माझी 'आकृती क्रिएशन्स' तुमच्या नव्या कोऱ्या कादंबरीची वाट बघतेय.''

'वाचकसुद्धा आतुरतेनं वाट बघतायत माझ्या नव्या कादंबरीची. वाचकांना पुन्हा एकदा आपण दुहेरी मेजवानी देणार आहोत - एक माझी कादंबरी आणि दुसरी 'आकृती क्रिएशन्स'ची त्या कादंबरीवरची सिनेमाची आविष्कृती...'

''चैतन्य, मलासुद्धा तुम्हाला काहीतरी दाखवायचंय'' - असं म्हणून तिनं टेबलवर ठेवलेलं बाड उचललं आणि त्याच्या पुढ्यात ठेवलं. तिकडे नजर टाकीत चैतन्यनं विचारलं - ''हे काय आहे?''

''ह्या मला जाणवलेल्या काही गोष्टी मी शब्दांकित केल्यायत''

''बऱ्याच दिसतायत''

''अहं... त्या गोष्टी थोड्याच आहेत. बाकी माझी त्यावरची टीका टिप्पणी आणि मतमतांतरं'' रचना उत्तरली

''मतं म्हणजे तुझी मतं ते कळलं. पण ही 'मतांतरं? ती कुणाची?''

''इतरांची''

''ह्या सगळ्याची काय जरूरी होती?... उगीच तुला मेहनत घ्यावी लागली''

''तुमच्यामागे धोशा लावून मी थकले. कितीतरी वेळा सांगितलं की नवीन कादंबरी लिहा - मला नवीन सिनेमा काढायचाय.''

''अगं, काही सुचतच नव्हतं.''

''थापा मारताय हं चैतन्य. एवढ्या काळात तुमच्या दोन नव्या कोऱ्या कादंबऱ्या आल्यायत सुद्धा. पण...''

''पण त्यावर सिनेमा बेतता येत नाहीय. हो नं?''

''अं...., हो..''

''मला त्याची जाणीव आहे रचना. योग्य त्या विषयाच्या शोधात होतो मी.''

''मिळाला का एकदम नवा विषय?''

''हो. हे बघ - काही मुद्दे सुचले ते टिपून ठेवलेयत - हे घे, वाच''

''तुम्हीसुद्धा मी लिहिलेलं वाचून बघा. तुमच्या कादंबरीसाठी एकदम नवा विषय सुचवतेय तुम्हाला.

''असं करू या - प्रथम मी लिहिलंय ते तू वाच. नंतर तुझे मुद्दे वाचेन. म्हणजे तुला दोन कादंबऱ्या एकदम मिळतील.''

रचनानं त्याचे कागद पुढे ओढले आणि ती वाचू लागली. वाचता वाचता रचना मध्येच त्याच्याकडे आश्चर्यानं बघत होती तर कधी कधी काहीतरी शोध लागल्यासारखी भुवया उंचावून त्याला खुणेनंच ''असं काय?'' म्हणून विचारत होती.

रचनाचे ते सारे विभ्रम चैतन्यला खूपच विलोभनीय वाटत होते. तिच्या चेहऱ्यावरच्या सगळ्या रेषा जणू बोलक्या झाल्या होत्या.. त्या रेषांमधून एक आकृती तयार होत होती. चैतन्य त्या प्रतिक्रियांवरून अंदाज बांधत होता. ती कधी आश्चर्यचकित होत होती तर; कधी 'बरोबर' ह्या अर्थानंही मान होकारार्थी हलवत वाचत होती. वाचून झाल्यावर ती म्हणाली - ''चैतन्य, हे सगळं तुम्ही...'' पण तिला अर्ध्यावरच थांबवत तो म्हणाला - ''थांब रचना... नंतरच बोलू.'' असं म्हणून तो तिचं बाड वाचू लागला... आता रचना त्याच्याकडे बघत बसली होती. मघाशी रचनानं दिलेल्या प्रतिक्रियांच्याच जातीच्या, पण जबरदस्त तीव्रतेच्या प्रतिक्रिया तो देऊ लागला. सरतेशेवटी त्याचं वाचन पूर्ण झाल्यावर ते दोघेही काही क्षण एकमेकांकडे बघत बसले आणि दोघांनी एकमेकांना एकाच वेळी हसत विचारलं - ''सृजन ऽऽऽऽ तू ऽऽऽ?''

''तू निर्मिती ऽऽऽ?

दोघांचा जबरदस्त हसण्याचा भर ओसरल्यानंतर चैतन्य म्हणाला, ''वा वा! काय नामी कल्पना होती तुझी!... प्रबंध लिहितेय म्हणालीस.''

''आणि तुम्हीसुद्धा सृजन बनून काय छान गप्पा मारत होतात चॅटिंगमध्ये!''

''खरं सांगू? 'कॉफी कॅफे' मध्ये त्या दिवशी तुला बघितलं नं त्याचवेळी एकच क्षण माझ्या मनात जोरदार विचार चमकला की तूच 'निर्मिती' असावीस. म्हणून मी नंतर त्या दिवशी चॅटिंगमध्ये म्हणालोसुद्धा की तूच माझी बायको कशावरून नाहीस?''

''पण मी ते सगळं हसण्यावारी घालवलं. खरं तर मीसुद्धा तुम्हाला बघितलं होतं.''

''काय म्हणतेस? कधी?''

''तुम्ही बराच वेळ गेटजवळ उभे राहून वाट बघितलीत आणि नंतर आत येण्यासाठी वळलात ना, तेव्हा... पण सुरुवातीला तुम्ही म्हणजे सृजन असं नव्हतं वाटलं मला. फक्त मी तिथं आहे हे तुम्हाला कळू नये यासाठी आटोकाट प्रयत्न करीत होते.''

''का? कसली भिती वाटली तुला?''

''भिती नाही. पण वाटलं तुम्हाला वाईट वाटेल की तुम्हाला न सांगता एकटीच 'कॉफी शॉप'मध्ये गेले म्हणून?''

चैतन्य हसून म्हणाला, ''तरीच मला निर्मितीची सारी मतं तुझीच आहेत असं सारखं वाटायचं.''

''माझी तर तेव्हा पूर्ण खात्रीच झाली होती की तुम्हीच सृजन आहात म्हणून.''

''चैतन्य तिच्या डोळ्यात बघत गंभीरपणे म्हणाला - ''रचना, समज, सृजन म्हणून कुणी वेगळाच असता तर तिकडे काय केलं असतंस?''

''अर्थातच निर्मिती बनूनच गप्पा मारल्या असत्या... अं... पण तुम्ही हे एवढ्या गंभीरपणे का विचारताय? विश्वास नाही का माझ्यावर?''

''छे छे! तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे माझा. पण 'सृजन' वर नाही ना! समजा तो कुणी वेगळाच असता आणि त्यानं तुझा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला असता तर?''

''मी असं कसं होऊ दिलं असतं? ते जाऊ दे. पण आता मनात विचार येतायत की... राणी, परी, संकल्प, चतुर हे सगळे नक्की कोण आहेत?''

''राणी आणि परीला मी भेटलोय. माझ्या टिपणांमध्ये वाचलंस ना तू?''

''हो... वाचलं नं! पण तुम्हाला 'कॉफी शॉप'मध्ये बघून मला नाही भीती वाटली की तुम्ही ज्या कुणाला भेटायला आलायत ती जर बाई असेल तर तुम्हाला तिची भुरळ पडेल.''

''थँक्स रचना. तुझा हा माझ्यावरचा अतूट विश्वासच मला असं सृजन बनून निर्मितीची भेट घेऊ पाहणारे अनुभव गोळा करणं शक्य करतो. अगं राणी आणि परी भेटल्या नं तेव्हा गंमतच वाटली. राणी चक्क प्रौढा आहे आणि परी एक तरुणी...''

''वाचलं मी ते. परीचं लग्न ठरलंय.. हल्लीच चॅटिंग करतांनाच....''

''अरे वा! हा एक नवीन मुद्दा छान आहे.''

''अं... तुम्ही त्या दोघींना त्या तरुणी असतील म्हणून भेटायला गेला होतात...?''

''हे तू निर्मिती म्हणून विचारतेयस की रचना माझी बायको म्हणून?''

''झाला तुमच्यातला नवरा जागा? प्रश्नाचं उत्तर छान टाळताय.''

''तेच तर मीही शोधतोय. रचना, तू मला मघाशी विचारलंस त्या प्रश्नात तू खरी कोण होतीस ह्यावरच या प्रश्नाचं उत्तर अवलंबून आहे. बायकोला वेगळं उत्तर आणि निर्मितीला वेगळं. कारण परीला, निर्मितीला, राणीला भेटायला गेलेला सृजन होता - चैतन्य नव्हता.''

''हो नं? मग सृजनला भेटायला गेलेली निर्मिती होती, रचना नाही. आणि परीला भेटायला जाताना तुमची भूमिका काय होती हे विचारणारी बायको होती.''

''आपण उगीचच आपल्या व्यक्तिमत्त्वाचं रोपण सृजन आणि

(पान ५ कॉलम ३ वर)

**हसरी रेखा** **-प्रदीप कोठारे**



# दृष्टिकोण

**-हेमंत विनायकराव तळपदे**

राम शेवाळे माझा वर्गमित्र अनेक दिवस उदास होता. अल्फा केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत तो अकाउंट ऑफिसर पदावर जवळजवळ २० वर्षे काम करत होता. पगार अंदाजे एकतीस हजार दरमहा. परंतु काहीतरी बिनसलेच. कंपनीच्या संचालकांच्या मतभेदामुळे कंपनी डबघाईला आली व सरतेशेवटी कंपनीने राम म्हटला. जवळजवळ १५० कामगार बेरोजगार झाले. कंपनीने कामगारांना ३ महिन्यांचा पगारही दिला. पण नोकरी सुटल्याचे दु:ख रामच्या मनात सलत होते. रामने अनेक ठिकाणी आवेदने केली. पण वयाच्या ४७ व्या वर्षी चांगल्या पगाराची नोकरी मिळणे कठीण झाले. तो जवळजवळ आठ महिने नोकरीच्या शोधात होता. त्याचा मुलगा इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षात शिकत होता. पत्नी सुविधा गृहिणी होती. त्यामुळे रामची आर्थिक चणचण होतीच. अनेक उपाय झाले. पत्नीची व्रतवैकल्ये झाली. पण चांगल्या पगाराची नोकरी मिळत नव्हती. तितक्यात सुविधाला मैत्रिणीने मुर्धा गावी हनुमान मंदिरात मोहनमहाराज शनिवारी व मंगळवारी बसतात आणि अडल्या गांजलेल्यांना उपाय सुचवितात असे सांगितले. रामला हे मनापासून पसंत नव्हते. तो सुविद्य होता. पण पत्नीच्या आग्रहाखातर तो शनिवारी मोहन-महाराजांकडे गेला. दोघेही संध्याकाळी सात वाजता मंदिरात पोहोचले. आरती झाली व त्यानंतर मोहनमहाराजांची बैठक सुरू झाली. अनेक नाडलेले, दु:खी हजर होते. प्रत्येकाला टोकन दिली होती. रामचा नंबर साडेआठ वाजता आला. सुविधाने महाराजांना रामला चांगली नोकरी मिळण्याबद्दल सांगितले. महाराज स्तब्ध झाले. एकाएकी बसल्या जागी घुमू लागले. आणि ''सहा महिन्यांपूर्वी तू असे महापाप केलेस त्याचे परिणाम अजूनही भोगत आहेस'' असे उद्‌गारले. राम गारच पडला. मध्यमवर्गीय पापभीरु असे काय महापाप करणार? याचे उत्तर त्याच्याजवळ नव्हते. सुविधा भक्तिभावाने महाराजांच्या पाया पडली. रामला महाराजांसमोर बोलण्याचे धाडस नव्हते. सुविधाने महाराजांनी अनुग्रह करावा अशी विनवणी केली. महाराजांनी जवळचा झाडू घेतला व रामच्या शरीरावर ५-७ वेळा फिरवला. नंतर हातात पाणी घेऊन मंत्र पुटपुटून ते पाणी रामच्या शरीरावर शिंपडले व दोन महिन्यात तुला चांगली नोकरी मिळेल असा आशीर्वाद दिला. सुविधाने निमूटपणे ५०० रुपये महाराजांनी ठेवलेल्या दानपेटीत टाकले.

आता रामने नवीन नोकरी शोधण्याचे काम आत्मविश्वासाने हाती घेतले आणि चमत्कार असा की एका महिन्यात त्याला मायक्रो हायजीनमध्ये तीस हजार रुपये पगाराची नोकरीही मिळाली. राम खुश झाला व मोहनमहाराजांचा निस्सीम भक्तही झाला. महिन्यातून कमीतकमी दोन शनिवार तो व सुविधा मोहनमहाराजांच्या दरबारात हजेरी लावू लागले.

या सर्व प्रकरणाकडे त्रयस्थ नजरेने पाहिले असता एक बाब ठळकपणे स्पष्ट होते. ती म्हणजे प्रत्येकाचा दृष्टिकोण. राम स्वत: सुविद्य होता. सुविधा गृहिणी असली तरी रामसारख्या सुशिक्षित इसमाची धर्मपत्नी होती. पण कठीण समय येता तीसुद्धा बुवाबाजीला शरण गेली. जीवनाकडे पहाण्याचा दोघांचाही दृष्टिकोण बदलून गेला. मोहनमहाराजही एक माणूसच. पण अडल्या गांजल्यांना मंतरलेले पाणी शिंपडून अथवा झाडू फिरवून एकप्रकारे मनाला उभारणी देण्याचे काम त्यांनी केले. अंधश्रद्धा विषयावर बोलणे टाळून मी एवढेच म्हणेन की, एखाद्या गोष्टीकडे आपण कसे पाहतो ते महत्त्वाचे आहे.

अर्धा ग्लास पाण्याने भरलेला असेल तर सकारात्मक दृष्टिकोन असलेला माणूस तो ग्लास अर्धा पाण्याने भरलेला आहे याबद्दल धन्यता मानेल तर आत्मविश्वास हरविलेला माणूस तो ग्लास अर्धा रिकामा आहे याची विवंचना करेल. सोसायटीच्या आवारात संध्याकाळी वयात आलेले तरुण व तरुणी गप्पा मारू लागले तर लोकांच्या नजरेत दृष्टिकोनात्मक बदल पहावयास मिळतो. मग ते मुलगा व मुलगी सधन असोत वा मध्यमवर्गीय असोत. मी तर म्हणेन प्रत्येक बाबींकडे आपण कोणत्या नजरेने पाहतो हे महत्त्वाचे आहे.

गंमत म्हणून एक उदाहरण देतो. एका सार्वजनिक समारंभात सदू, विनू व गोट्या एकत्र गेले. त्यांची वये अंदाजे १२ ते १४ वर्षे. समारंभाला विभागातील श्रीमंत शेटजी प्रमुख पाहुणे होते. मंडप खचाखच भरला होता. त्यांना केवळ पहिल्या रांगेत तीन खुर्च्या रिकाम्या आढळल्या. ते पटकन त्यावर स्थानापन्न झाले. इतक्यात प्रमुख पाहुणे शेटजी, त्यांची पत्नी व मुलगा मंडपात आले. आयोजकांनी त्यांना आदराने पहिल्या रांगेपर्यंत आणले. पण त्यांच्या आरक्षित खुर्च्यांवर सदू, विनू व गोट्या बसलेले पाहून आयोजकांनी दम देऊन तिघांना उठविले. त्या खुर्च्यांवर शेटजी, पत्नी व मुलगा स्थानापन्न झाले. बिचारे सदू, विनू व गोट्या अपमानित होऊन कोपऱ्यात उभे राहिले. सदूच्या मनात विचार आला 'मी या शेठजीचा मुलगा असतो तर किती बरे झाले असते?' विनूने विचार केला, 'काहीही करून मी या शेठजींसारखा श्रीमंत होईन.' तर गोट्याने विचार केला, 'या श्रीमंत व नाटकी नगरव्यवस्थेला मी सुरुंग लावीन व संपूर्ण मानवजातीला एकाच पातळीवर आणेन.' घटना एकच. पण दृष्टिकोन मात्र तीनही भिन्न. यात कोणता योग्य वा अयोग्य हे ज्याचे त्याने ठरवावे. असो.

आणखीन एक उदाहरण देतो. एकदा एका शिक्षकाने फळ्यावर एक मोठा पांढरा कागद चिकटवला व त्यावर काळ्या पेनाने एक मोठा बिंदू ठळकपणे काढला व विद्यार्थ्यांना विचारले, ''तुम्ही नक्की काय पाहिलेत?'' मुलांनी उत्तर दिले, ''एक मोठा काळा ठिपका आहे सर.'' ''का रे बाळांनो, एवढा मोठा पांढरा कागद तुम्ही का नाही पाहिलात?'' सर्वजण गप्प झाले.

तात्पर्य हेच, आपण कोणत्याही बाबीकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो हे महत्त्वाचे आहे. मग ते आपले वैयक्तिक जीवन असो, पारिवारीक संबंध असो वा आपली सामाजिक भूमिका असो. प्रत्येक बाबतीत आपला दृष्टिकोण महत्त्वाचा ठरतो. मी तर म्हणेन दिवसातल्या २४ तासात संध्याकाळी अथवा रात्री आपण केवळ पाच मिनिटे आपल्या दिनचर्येविषयी स्वत:च्या मनाशी उजळणी केलीत तर आपले आज काय चुकले हे पटकन उमजेल व त्यानुसार आपण आपले जीवन सकारात्मक दृष्टिकोनातून जगायला प्राधान्य देऊ असे मला वाटते.

तर मित्रहो, आपला दृष्टिकोन आपले जीवन आनंदमयी करण्यास सहाय्यक ठरो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करून येथेच थांबतो.

# आनंदाचे डोही, आनंद तरंग!

**-सौ. सुरेखा सुरेश नवलकर**

लग्नाचा वाढदिवस हा शब्दच मनाला किती आनंदी ठेवतो हा अनुभव सर्वांचाच! त्यातून तो जर २५ वा किंवा ४० वा असेल तर... आणि ५० वा म्हणजे तर काय; दुधात साखर, जिलेबी सोबत रबडी असा! सुवर्णाची झळाळी देणारा, मनमोराचा पिसारा फुलवणारा असा अत्युच्च आनंदाचा हा क्षण! नशीबाने आम्हाला तो लाभला!

तसे माझे आईवडील सौ. अंजना बाबुराव राणे उर्फ अंबालिका सदानंद तळपदे व श्री. बाबुराव व्यंकटराव राणे यांच्या लग्नाला झालेली ६२ वर्षेही जमेल तशी साजरी केली होती. माझे आजी-आजोबा सौ. सुलोचना सदानंद तळपदे व श्री. सदानंद विनायक तळपदे यांच्या लग्नालाही ५३ वर्षे झाली होती. हे उल्लेख एवढ्यासाठीच केले कारण त्या त्या वर्षी मी प्रभुतरुणात त्यांच्यावर लेख लिहिले होते. असो. या सर्वांच्या आशीर्वादामुळे हा सोहळा आमच्याही आयुष्यात आमच्या मुलांनी त्यांच्या आमच्यावरील प्रेमामुळे कौतुकाने साजरा केला.

२ जून हा आमच्या लग्नाचा वाढदिवस!

२ व ३ जून साठीचे कार्यक्रम १ मे लाच मुलांनी ठरवून त्याप्रमाणे आमंत्रणे करणे, कार्यक्रमाची आखणी करणे, व इतरही अनेक गोष्टी आमची मुले स्वप्नील-निखिल, त्यांच्या पत्नी अनु-शीतल-किरण व नाती सुरभि - आद्या यांच्या सहकार्याने प्रत्येकाने नोकऱ्या व नातींनी त्यांचे अभ्यास सांभाळून पार पाडल्या.

२ जूनला शुक्रवारी (आमचे लग्नही शुक्रवारीच झाले होते.) सत्यनारायणाची पूजा घरीच करून देवदेवतांचे आशीर्वाद घेतले. पूजेसाठीचे सागुपुरीचे लग्नाचे साग्रसंगीत जेवण व प्रसाद दोन्ही सुनांनी स्वत:च्या हाताने बनवले होते. माफक मेकअप व केसांना वळवून नातींनी मला सजवले होते आयांच्या मार्गदर्शनाखाली!

शनिवारी, ३ जूनला नातेवाईक, मित्रमैत्रिणी, हितचिंतक सर्वांना बोलावून कांदिवलीत हॉलवर एक अवर्णनीय व देखणा सोहळा मुलांनी साजरा केला. ब्युटीशियनला बोलावून आमचा पूर्ण मेकओव्हर करून नव्या कोऱ्या कपड्यांनी आम्हाला नटवले.

हॉलवर येणाऱ्या मंडळींशी नाट्य-चित्र ॲवॉर्ड समारंभ प्रसंगी होणाऱ्या रेड कार्पेटवर होते तशी प्रश्नोत्तरे व बातचीत नाती व मुलांनी केली.

थोडेसे फोटोसेशन झाल्यावर आम्हा उभयतांना मुंडावळ्या बांधून दोन्ही नातींनी एका मागून एक स्टेजवर नेऊन अंतरपाटाआड उभे केले. मंगलाष्टके झाल्यावर आम्ही एकमेकांना हार घातले. बहिणी, नणंदा, जावा, भावजया, मैत्रिणी, भाच्या सर्व महिला वर्गाने आरत्या केल्या. थाळ्यात ५० पणत्या लावून ठेवून सर्व महिला वर्गाने आमचे

(पान ५ कॉलम १ वर)

(पान ४ कॉलम ४ वरून)

पणत्या ओवाळून औक्षण केले. मोठा 'वेडिंग केक'ही आम्ही नंतर कापला.

नंतर आमचे बालपण, तरुणपण, लग्न, हनिमून व मोठे झाल्यावरचा निवांतपणा ह्यांचे फोटो, आमचे आईवडिल, भावंडे यांचेही फोटो, आमचे छंद, आवडी निवडी, माझे पोहोण्यात मिळवलेले प्राविण्य, या सर्वांची एव्ही दाखवली गेली; जी नातींनी तयार केली होती.

काही खेळ झाले. आम्ही एकमेकांना किती ओळखतो याची परीक्षा, माझे कवितावाचन, आलेल्या मित्रमैत्रिणी, नातेवाईक, नातवंडे, भाचवंडे सर्वांना माईक देऊन बोलते केले. कधीही न ऐकलेल्या आमच्याबद्दलच्या त्यांच्या भावना त्यांच्या मुखातून ऐकताना व त्यांच्या डोळ्यातून वाहणाऱ्या आनंदाश्रूधारांमुळे शब्दांचा खरेपणा सर्वांच्याच मनाला भिडला.

आम्हीच घरात मोठे, प्रथम लग्न झालेले, सासरी व माहेरीही! त्यामुळे हा समारंभ आयोजित केल्याबद्दल सर्वांनी आमच्या मुलांचे आभारही मानले. त्यांचे कौतुक केले.

सुग्रास भोजन, उखाणे, भरवाभरवी झाल्यावर सर्वांना प्रॉप घालून काढलेले त्यांचे प्रसंगानुरूप फोटो आठवण म्हणून देण्यात आले.

सर्व कल्पना मुलांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या! आम्हा दोघांनाही कार्यक्रम कसा असणार आहे याची गंधवार्ताही नव्हती. अभिमान वाटला सर्वांचा!

आम्ही आणखीही भाग्यवान की ह्यांच्या ९६ वर्षांच्या आत्या - सुंदर नवलकर उर्फ आमच्या बेनआत्या यांनीही उपस्थित राहून पूर्ण कार्यक्रमाची मजा लुटली व ५० आंब्यांची भेट देऊन आम्हाला शुभाशीर्वाद दिले.

माझी आवडती मैत्रीण निमा नयन नवलकर हिने आमच्या आवडीचे गीत 'जीवनात ही घडी अशीच राहू दे' - गाऊन समारंभाचा आनंद वाढवला.

तारुण्य व वार्धक्य ह्यांच्या उत्साहाचा मुलांनी घातलेला मेळ, नाविन्यपूर्ण समारंभ, ७५ जणांची उपस्थिती आणि सर्वांच्याच चेहऱ्यावरची तृप्ती यामुळे पुढील आयुष्य नव्याने जगण्याची स्फूर्ती आम्हा उभयतांना मिळाली.

आभार त्या परमेश्वराचे की ज्याने कल्पनेपलीकडचे हे विश्व आम्हाला बहाल केले.

ह्या निमित्ताने ५० व्या वर्षात १२ उखाणे मी स्वत: तयार केले होते. त्यातील काही...

१) तू माझा सांगाती म्हणत केली होती संसाराला सुरुवात
सुरेश तुमच्यात जीव गुंतल्याने सदैव झाली आनंदाची बरसात।।

२) मुरांबा मुरतो दळदार कैरीमुळे लोणचे बनते स्वादिष्ट
आंबट गोड कैरीमुळे सुरेश, अरे आपलाही संसार रंगला
तुझ्या आगळ्या वेगळ्या स्वभावामुळे।।

३) ५० वर्षात... मन उमलले फुलासारखे हळुवारपणे
वारा वाहिला सुगंध घेऊन खूप प्रेमाने
आमच्या संसारात आनंद भरून राहिला
स्वप्नील निखिलच्या रूपाने सुरेशरावांचे नाव घेते गदगदलेल्या गळ्याने।

*

## अनुवाद-संवाद

| Poetry Uninhibited<br>By SHANOOR MIRZA | **कविता मुक्ता**<br>अनुवादिका - **कल्पना सुभाष कोठारे** |
|---|---|
| Poignant emotions, unclutterd, unbridded,unfettered | हेलावून टाकणाऱ्या, सुटलेल्या बटांसारख्या विस्कळीत मुक्त भावना |
| Runway flow og thoughts all seized up | इतस्तत: विखुरणारे विचार, तुंबविणाऱ्या भावना- |
| In a symphony of rhythmic strokes in verses | सुरेल वाद्यवृंदाच्या तालांचे कडव्यात गुंफलेले फटकारे- |
| That is the power of reading what stimulates your mind | अशी ही वाचनाची किमया- मनाला ढवळणारी! |
| To unimaginable realms of poetry. | |
| Unhinfered, mindless pursuit of release of bonded hurt, | थोपविता न आलेला, निरुद्देश, मानसिक भावनांचा पूर- |
| Clausterphobic, bridled, saddled humainity | भीतीदायक जादुई पेडांची गुंफण अन् माणुसकी जणु अश्वारूढ! |
| Limitless, perfect harmony, bodyless soul, passonate disposition | अपार, असीम पूर्णत्व, अशारीरिक मन, झपाटलेला उद्रेक |
| Demarcated vocabulary, infinite ceaseless out pourings, | सीमित, अंतिम तरीही अनंत भावना ओतीव- |
| Countless encounters, poigmamt melodies, melodious poesy | अमाप गाठीभेटी, छळवादी सूर, वर्णने उघडी-शाब्दिक |
| Imperfect perfections, boundless zest, sematic expositions | |
| Fearless, relentless, insurmounttable | अपार भीतीपासून शाश्वत मुक्ती- |
| Release from limitlee fears... | अशी ही कवितेची महती! |
| The power of poetry | |

from (Expressions, Insight HITVADA, Nagpur)

*

(पान ३ कॉलम ४ वरून)

निर्मितीवर करतोय रचना. ते जाऊ दे. आपल्या 'फ्रेंडस् लिस्ट' मधले संकल्प, चतुर कोण आहेत? निपुण खरा कोण होता? स्वत:च्या आत्महत्येची सुपारी देऊ करणारा आणि मारला गेलेला निपुण होता की दुसराच कुणीतरी? आणि खरा निपुण अजूनही वेगळ्याच नावानं अशा सुपारी घेणाऱ्याचा शोध घेतोच आहे?'' चैतन्यनं मनातले प्रश्न रचनाला विचारले.

''चैतन्य, मीसुद्धा ह्याच प्रश्नांची उत्तरं अजून शोधतोय. पण ही उत्तरं आपल्याला मिळणं अशक्य आहे. पोलीसच ते शोधून काढतील. पण आपल्याला ती माणसं खरी कोण हे कधी कळणारच नाही'' - रचना खंतावली.

''त्याची काही जरूरीसुद्धा नाही रचना समज, त्यांची खरी नावं, गावं कळली तरी त्याचा काय उपयोग आहे? जसे आपण खऱ्या आयुष्यात पती-पत्नी आहोत तसे या सगळ्यांपैकी कोणी असतील? ही कादंबरी वाचून आणि तुझा त्यावरचा सिनेमा बघून त्यांना कळेलच की मीच तो सृजन आणि तूच ती निर्मिती.''

''कोण जाणे! पण कळलं तरी मजाच वाटेल त्यांना'' रचना म्हणाली.

''त्यांना कळलंय की नाही हे आपल्याला कधीच कळणार नाही. कारण मी पुन्हा कधीच सृजन या नावानं चॅटिंग करणार नाहीय. कदाचित तेसुद्धा त्यांची नावं बदलतील... खोट्याचं खरं आणि खऱ्याचं खोटं बेमालूमपणे मिसळवते ही चॅटरूम... चल बराच वेळ बोललो. आता कामाला लागू या. मजा आहे नाही? एकाच वेळी एकाच खोलीत बसून एकाच घरातले दोन जवळचे जीव एकमेकांशी चॅटिंग करतात तेही एकमेकांना कळू न देता..''

चैतन्यनं कोऱ्या कागदांची चळत पुढे ओढली आणि त्यानं कादंबरीचं शीर्षक लिहिलं - 'चॅटरूम'

*

(पान २ कॉलम ४ वरून)

सादर केले. डॉ. हर्षद विजयकरांचे 'ओंकार स्वरूपा', कौमुदी राणे यांनी संवादिनीवर (स्वत:) सूर धरून सादर केलेला 'रुणुझुणु, रुणुझुणु रे भ्रमरा' अभंग, प्रदीप राणे यांचे 'सुखके साथी', 'सुरुपा राणे - देवरुखकर यांचे 'ऐ, मालिक तेरे बंदे हम', सौ. सीमा मकरंद कीर्तिकरांचे 'तोरा मन दरपन', सौ. अक्षदा तळपदेंचे 'विजय पताका श्रीरामांची'... अशा सादर झालेल्या अनेक भक्तीगीतांनी श्रोत्यांच्या मनात गुंजन केले. सौ. रजनी कोठारेंनी सादर केलेले 'रंग तुझा सावळा' तर श्रोत्यांच्या मनातच सूररंग उजळवून गेले. कै. मोहनतारा अजिंक्य यांनी अमर केलेले 'गेला कुठे बाई कान्हा' त्यांची आठवण जागवत सादर केले श्रीम. क्षमा कोठारे यांनी. हे नेहमीचे यशस्वी कलाकार होतेच. पण यंदा सौ. विदुला श्रीनल कोठारे यांनी गाइलेल्या 'मन मंदिरा तेजाने' या गीताने सभागार तेजाने भरून गेले; श्री. मिलिंद सेंजित यांनी 'तू प्यारका सागर है।' सादर केले, सौ. शर्मिला विजयकर, मिलिंद सेंजित, सौ. विदुला कोठारे हे यावर्षी या यात्रेत नव्यानेच सामील झालेले सूर प्रवासी.

या सूरयात्रेचा शेवट भैरवीने झाला. कै. प्रवीण राणे यांनी 'माझे मनोरथ पूर्ण की जे देवा' हा भैरवीत बांधलेला अभंग सादर केला श्रीम. क्षमा कोठारे, सौ. रजनी कोठारे आणि सौ. रॉनिका विजयकरांनी. संत नामदेवांच्या या अभंगाने सांगता झाली; हे औचित्यपूर्णच.

सौ. पल्लवी कोठारे यांनी आभार मानले. संवादिनीवर श्री. प्रभुदेसाई आणि श्री. वसंत मोरे होते सूर धरायला तर; श्री. प्रदीप राणे आणि श्री. अवधूत चौबळ यांनी तबल्याचा ठेका सांभाळला. श्री. गजानन मांद्रेकर यांचा 'साईड ऱ्हिदम' होता. 'बाबू साऊंड'ने ध्वनियंत्रणा सांभाळली. यात्रेकरूंच्या तालमीसाठी सौ. नीता सेंजित यांचे घर आणि अर्थातच चहापान ही व्यवस्था उपलब्ध होती तर; तालमीला मार्गदर्शन श्री. प्रदीप राणे यांचे होते. यात्रेला श्रोत्यांची तुडुंब गर्दी होती. चॅरिटीजची कार्यकारिणी, प्रभुप्रभात आणि प्रभुतरुण ही वृत्तपत्रे यांनी नेहमीप्रमाणे सहकार्य केले.

यंदाच्या अभंगयात्रेची काही ठळक वैशिष्ट्ये अधोरेखित करण्याजोगीच. बालकलाकारांचा उत्स्फूर्त वाढता सहभाग आनंददायी होता. या वर्षी नवीन गायकांनी सूरमयी मेजवानी दिली; तर सूत्रसंचालन स्वाती राणे यांच्याकडून नीता सेंजित यांच्याकडे जाऊन एक नवी परंपरा तयार झाली. अभंग यात्रा अशीच अभंगपणे चालूच राहील याची खात्री या विशेषांमुळे अधिकच अधोरेखित झाली.

आषाढसरी, धुंदफुंद वातावरण, भक्तिमय तल्लीनता यांना या अभंगयात्रेने आपला भावपूर्ण स्वर दिला. 'सूरमयी सांज' जीवंत केली.

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

१९-०६-१७ श्री. सौरभ नीलेश प्रधान, पुत्र, मुलुंड

### नांदा सौख्यभरे

१९-०६-१७ कु. श्रद्धा संदीप नवलकर श्री. सतीश यशवंत राजाध्यक्ष. (आं. ज्ञा.)
०९-०७-१७ कु. प्रेरणा प्रवीण मानकर श्री. श्रीनिवास सुंदर राजन (आं. ज्ञा.)

### मरण

१८-०५-१७ श्री. दीपक रामकृष्ण नायक, वय ७९, मालाड
१४-०७-१७ श्री. रमेश शामराव कोठारे, वय ७९, मालाड

## प्रभुतरुणास देणगी

★ कै. सौ. कामिनी आणि कै. श्री. गोविंदराव भगवंतराव आगासकर यांच्या जन्मशताब्दिनिमित्त मृदुला प्रभुराम जोशी यांजकडून रु. ५०००/-

★ सौ. नीला आणि श्री. मोहन रामचंद्र जयकर यांजकडून त्यांची नात कु. करिष्मा अजय जयकर हिच्या पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट (ॲडव्हरटायझिंग आणि कम्युनिकेशन) मध्ये ‘ए+ ग्रेड व २०१७ या शैक्षणिक वर्षाचा ‘स्टुडण्ट ऑफ द इयर’ हा पुरस्कार मिळाल्याबद्दल रु. १००१/-

★ सौ. रेश्मा आणि श्री. मिलिंद तारकनाथ जयकरकडून कै. श्री. तारकनाथ लक्ष्मीकुमार जयकर यांच्या दुसऱ्या स्मृतिदिनानिमित्त (१९ जुलै २०१७) रु. ५००

★ सौ. रीटा मंदार नायककडून त्यांचे पती श्री. मंदार माधव नायक यांच्या ७०व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. ५००/-

★ सौ. शोभा नंदकुमार धैर्यवान यांजकडून त्यांची नात कु. अवनी हिच्या पहिल्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. २५०/-

★ सौ.प्रणिता आणि श्री. अरविंद धराधरकडून त्यांचा नातू आलोकच्या स्कॉलरशिप परीक्षेतील यशाप्रीत्यर्थ रु. १०१/-

सर्व देणगीदारांचे आभार.

## पाठारे प्रभु महिला समाज

महिला समाजाचा १०२ व्या वर्षाचा अहवाल प्राप्त झाला. शिवणवर्गाच्या शताब्दी वर्ष निमित्ताने मुखपृष्ठावर अतिशय बोलकी अशी शिवणवर्गाची छायाचित्रे आहेत. ‘प्रेरणा घेऊ या बदल घडवू या’ हे घोषवाक्यही प्रेरणादायकच आहे. नीटस असा हा अहवाल महिला समाजाच्या वार्षिक कार्याची नेटकी नोंद घेणारा आहे. आर्थिक अहवालही भरवसा वाढवणारा आहे.

## पाठारे प्रभु सोशल समाज

सोशल समाजाचाही वार्षिक अहवाल प्राप्त झाला. १३९ वा वर्धापन दिन साजरा झालेल्या सोशल समाजाचे अनेक कार्यक्रमांच्या भिती वाढवून अधिक विकासाकडे पाऊल पडते आहे. त्याची समग्र नोंद या अहवालात आढळते. कॅरम व बेझिक सामने आयोजित करून समाजाने आपल्या कार्याचा परीघ वाढवला आहे. वार्षिक कार्यक्रमांची आणि उपक्रमांची दखल आर्थिक हिशोबासह या अहवालात आहे.

★ चि. अर्णव आलोक धराधर महाराष्ट्र स्टेट कौसिल, पुणे आयोजित प्रिअप्पर प्रायमरी स्कॉलरशिप परीक्षेत ८३.८९ टक्के गुण मिळवून मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्टमध्ये २०वा आला आणि पार्ले टिळक हायस्कूल, विलेपार्ले येथून ४था आला. अभिनंदन

### चुकीची दुरुस्ती

गतांकी ‘देणगी’ सदरात सौ. सुरेखा आणि सुरेश मनोहर नवलकरकडून देणगी असे कृपया वाचावे.

## व्याख्यान

पाठारे प्रभू को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडतर्फे दि. १६ सप्टेंबर २०१७ शनिवार रोजी वीरमाता अनुराधा गोरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात येत आहे.

‘‘जवानांच्या शौर्यकथा व सियाचीन’’ या विषयावर त्या माहिती व चित्रफीत दाखवणार आहेत. हा कार्यक्रम सोसायटीच्या हॉलमध्ये, १२ वा रस्ता खार (पश्चिम) येथे सायंकाळी ४.३० ते ७.०० पर्यंत आहे. सदर कार्यक्रमास सर्वांनी अवश्य उपस्थित रहावे असे आवाहन व्यवस्थापकीय समितीने केले आहे.

## परीक्षेतील सुयश

**दहावी**

कु. श्रद्धा दीपक धराधर ४१७/५००, ८३ टक्के

**सी.बी.एस.सी.**

श्री. रोहित विनय दीपक विजयकर ८८ टक्के

श्री. साहिल आशिष व्यवहारकर ७४ टक्के

**दहावी**

श्री. पराग मिलींद धराधर ९०.८० टक्के

श्री. हर्ष राजेश देसाई, ६४ टक्के

**बारावी कॉमर्स**

कु. भविष्या जयेश धुरंधर ७४ टक्के

कु. श्रेया अमरेश राव ४७७/६५०

**बी. बी. ए. (बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन) मणिपाल युनिव्हर्सिटी**

कु. सुचिका विनय दीपक विजयकर, ए प्लस ग्रेड

**एफ्. वाय. बी. एस्.सी.** (एच. एस. प्रोग्रॅम)

कु. अनुष्का आशीष नवलकर या विद्यार्थिनीला हॉटेल मॅनेजमेंट मध्ये ९०.१२ टक्के मिळाले आणि ती प्रथम आली. अभिनंदन.

**पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट (पीजीडीएम.) इन मीडिया ॲण्ड कम्युनिकेशन**

कु. करिष्मा अजय जयकर ग्रेड ए प्लस

## अभिनंदन

★ प्रा. श्री. संजीव धुरंधर (इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी ॲण्ड ॲस्ट्रोफिजिक्स, पुणे येथे कार्यरत) यांना अतिशय मानाचा असा ‘एबीपी माझा’चा पुरस्कार जाहीर झाला. प्रभुमनांत आनंदी आनंद होण्याजोगीच ही घटना. अभिनंदन.

★ लोकसत्ता पुरवणीत ‘परसबाग’ या विषयावर श्री. विश्वास अजिंक्य यांचा विस्तृत लेख प्रसिद्ध झाला.

★ ‘लोकसत्ता’प्रणीत ‘पूर्णब्रह्म’च्या अंकाचे प्रकाशन दिनांक २५-७-१७ रोजी रवीन्द्र नाट्यमंदिरात थाटामाटाने झाले. या ‘पूर्णब्रम्ह’मध्ये कल्पना तळपदे या पाककृती तज्ञांच्या पाककृती समाविष्ट आहेत. ठाणे येथे विष्णु मनोहर यांनी त्यांची मुलाखतही घेतली.

★ ‘प्रभुतरुण’च्या संपादिका प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांची विलास शिरसाट यांच्या कथासंग्रहाला विस्तृत प्रस्तावना लाभली आहे. तसेच के. ज. पुरोहित कथास्पर्धेच्या त्या परीक्षक होत्या.

★ ‘मास्टर्स इन कॉम्प्युटर इंजिनियरींग’ करण्यासाठी श्री. प्रतीक प्रकाश विजयकर न्यूयार्क युनिव्हर्सिटी (न्यूयार्क) येथे दाखल होणार आहेत. (१६ ऑगस्ट रोजी) शुभेच्छा.

★ ‘स्पेशलायझेशन इन सेक्युरिटीज फायनान्स’ मध्ये खास कार्यक्षमता असलेल्या सौ. प्रीती प्रकाश विजयकर यांची स्टेट बॅंकेच्या ॲपेक्स ब्रॅंचमध्ये विभागीय व्यवस्थापक म्हणून नियुक्ती झाली. सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बॅंक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67